2025
International Year of Cooperatives

महाराष्ट्र शासन

# सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय

**नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, ५, बी.जे.रोड, पुणे-४११००१.**

**दूरध्वनी क्र.: २६१२२८४६/४७** **Email - commpat2018@gmail.com**

जा.क्र.सआ-५/पत/निमं-MIS/मुदतवाढ/ २६ /२०२६ दिनांक :- 9 जानेवारी, २०२६

प्रति,

१) विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था (सर्व)

२) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व).

३) उपनिबंधक / सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (सर्व)

**विषय :- महाराष्ट्र राज्य बिगर कृषि सहकारी पतसंस्था नियामक मंडळ, पुणे यांचे Management Information System या ऑनलाईन प्रणालीमध्ये माहिती भरण्याबाबत मुदतवाढ.**

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र दि.०७/११/२०२५, १९/११/२०२५, २८/११/२०२५ व ११/१२/२०२५

उपरोक्त विषयांकीत संदर्भीय पत्रांकडे आपले लक्ष वेधण्यात येत असून त्याचे अवलोकन करावे.

उपरोक्त संदर्भीय पत्रांद्वारे MIS ऑनलाईन प्रणालीमध्ये माहिती भरण्याबाबत आवश्यक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. याबाबत वेळोवेळी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे आपले कार्यक्षेत्रातील सर्व पतसंस्थांनी माहिती भरणेबाबत सुचना देण्यात आल्या होत्या. तसेच सदर ऑनलाईन प्रणालीमध्ये माहिती भरण्याचा कालावधी दि.३१/१२/२०२५ पर्यंत वाढविण्यात आला होता.

तथापि, अद्यापही राज्यातील सर्व नागरी / ग्रामीण बिगर कृषी / पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्थांनी सदर प्रणालीमध्ये माहिती भरलेली नसल्याचे निदर्शनास येते. **त्यामुळे सदर ऑनलाईन प्रणालीमध्ये माहिती भरण्याचा कालावधी अंतिमत: दि.३१/०१/२०२६ पर्यंत वाढविण्यात येत आहे.** यानंतर कोणत्याही परिस्थितीमध्ये मुदतवाढ दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सुचना देणेत येत आहेत.

i) सदर प्रणालीमध्ये आपले कार्यक्षेत्रातील सर्व नागरी / ग्रामीण बिगर कृषी / पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्थांची माहिती सदर मुदतीमध्ये भरली जाईल, याची दक्षता घ्यावी.

ii) ज्या कार्यरत पतसंस्थांची माहिती दि.३१/०१/२०२६ पर्यंत सदर प्रणालीमध्ये भरली जाणार नाही, त्यांचा शोध घेऊन त्यांचेवर कायदा व नियमामधील तरतूदीनुसार आवश्यक ती कायदेशीर कारवाई प्रस्तावित करावी.

iii) तालुकास्तरीय उपनिबंधक / सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांना पतसंस्थांचे जादा / दुबार लॉगीन काढून टाकण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. ज्या पतसंस्थांनी एकापेक्षा जास्त वेळा लॉगीन केले आहे, अशा जादा / दुबार लॉगीनची खात्री करण्यात यावी आणि सदर जादा / दुबार लॉगीन प्रणालीमधून काढून टाकण्यात यावेत.

iv) सदर प्रणालीसाठी आपले कार्यालयास लॉगइन आयडी व पासवर्ड उपलब्ध करुन दिलेले आहेत. त्यानुसार आपले कार्यालयाचे प्रोफाईल त्वरीत अद्यावत करण्यात यावेत.

Taware

**(दिपक तावरे** भा.प्र.से.)
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे